सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!


# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १५३ | सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





डॉ. श्री. उल्हास पाटील
माजी खासदार



सौ.प्रतिभा पाटील
योगशिक्षिका



श्री. मनीष सेनानी
अमळनेर



श्री.संकल्प वैद्य
सामाजिक कार्यकर्ते



श्री. शेखर महाजन
अमळनेर



डॉ. श्री. निलेश जैन
अमळनेर



श्री. पंकज गोकलाणी
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

**जय भारत...! जय स्वदेशी...!!**


# तालुक्यातील ६७ ग्रामपंचायतींत सरपंच बनणार प्रशासक

## शासनाने दिले जि. प. सीईओंना नेमणुकीचे अधिकार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील अनेक ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारी २०२६ ला संपत आहे. मात्र या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे शक्य नसल्याने शासनाने या ग्रामपंचायतींवर सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्यात उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती नेमण्याचेही नमूद केले आहे. त्यामुळे सहा महिने किंवा पुढील निवडणूक होत नाही तोपर्यंत विद्यमान कार्यकरिणीच कारभार पाहणार आहे.

अमळनेर तालुक्यात ११९ ग्रामपंचायती आहेत. त्यातील आंचलवाडी, आर्डी, आटाळे, बोदर्डे, बोहरा धानोरा, दापोरी बुद्रुक, धावडे, ढेकू खुर्द, देवगाव, चौबारी, एकलहरे, एकतास, फापोरे बुद्रुक, एकरुखी, गांधली, गडखांब, गलवाडे खुर्द, गलवाडे बुद्रुक, हिंगोणे खुर्द प्र. अ., हिंगोणे खुर्द प्र. ज., जवखेडा, जुनोने, जळोद, करणखेडे, कळंबे, कलाली, कावपिंप्री, कळमसरे, कंडारी, कुन्हे बुद्रुक, खेडी प्र. ज., खवशी, खेडी प्र.अ., लोण खुर्द, लोण चारम, मेहेरगाव, म्हसले मांडळ,



मुडी प्र. अ., निंभोरा नांद्री, निम, पिळोदे, पातोंडा, पाडसे, पळासदळे, प्रगणे डांगरी, पिंगळवाडे, पिंपळे बुद्रुक, पिंपळी प्र. ज., पाडळसरे, रामेश्वर बुद्रुक, रामेश्वर खुर्द, सारबेटे बुद्रुक, सारबेटे खुर्द, सावखेडा, सबगव्हाण, सोनखेडी, सात्री, शिरूड, शहापूर, तांदळी, टाकरखेडे, वासरे, वाघोदे, झाडी आदी ६७ ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यात येणार आहे.

शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी ग्रामपंचायत अधिनियम १८२ (१) प्रमाणे कलम १५१ प्रमाणे प्रशासक नेमण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे पुन्हा विद्यमान कार्यकरिणीला एकप्रकारे ग्रामपंचायतीचा कारभार पाहण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत.



# मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे पैलाड, मुंदडानगरचा पुरवठा खंडित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अंबऋषी टेकडी जलशुद्धीकरण केंद्रातून लक्ष्मीनगर, मुंदडानगर आणि पैलाड जलकुंभाकडे जाणारी मुख्य जलवाहिनी फुटली आहे. त्यामुळे पुढील भागांतील पाणीपुरवठा तात्पुरता थांबविण्यात आला आहे. त्यात पैलाड, मुंदडानगर आणि लक्ष्मीनगर जलकुंभांतर्गत येणारा सर्व परिसर.

दरम्यान, सध्या जलवाहिनी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम पूर्ण होताच संबंधित भागांत पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. तरी या भागांतील नागरिकांनी याची नोंद घ्यावी व सहकार्य करावे, असे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

# लोंढवेत मधमाशांच्या हल्ल्यात १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील लोंढवे येथे शेतातील मधमाशांचे पोळे झेलायला गेलेल्या १९ वर्षीय तरुणाचा मधमाशांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

याबाबतची माहिती अशी, की राहुल कैलास पाटील (वय १९) हा सायंकाळच्या सुमारास धुळे ते अमळनेर रस्त्यालगत असलेल्या आपल्या शेतात मधमाशांचे पोळे झेलण्यासाठी गेला होता. मधमाशा चावू नयेत म्हणून त्याने प्लास्टिकची पिशवी डोक्यावरून घालून तोंडाभोवती घट्ट गाठ मारली होती. त्यानंतर त्याने मध झेलण्यास सुरूवात केली. मात्र मधमाशा चवताळल्या. त्यांनी राहुलवर जोरदार हल्ला चढवला. मधमाशांनी जोरजोरात दंश करण्यास सुरूवात केल्याने घाबरलेल्या अवस्थेत राहुल पळू लागला. तोंडावर मधमाशा येऊ नयेत म्हणून त्याने पिशवी घट्ट पकडून ठेवली. पळता-पळता तो खाली पडला. त्यामुळे त्याची प्रकृती गंभीर झाली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी त्याला तातडीने डॉ. अनिल शिंदे यांच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र त्याचा रक्तदाब प्रचंड वाढल्याने प्रकृती अधिकच गंभीर बनली. त्यामुळे पुढील उपचारासाठी त्याला ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मृत घोषित केले. तरुणपणीच झालेल्या राहुलच्या निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती त्याच्या चुलतभावाने अमळनेर पोलीस स्टेशनमध्ये दिली. त्यानुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. हवालदार काशिनाथ पाटील पुढील तपास करीत आहेत.

# शरद पवार पुन्हा रुग्णालयात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांची प्रकृती आज काहीशी बिघडली. त्यांना अशक्तपणा जाणवत असल्याने पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी बऱ्यापैकी कमी झाली असून त्यांना थकवा जाणवत असल्याचे डॉ.परवेझ ग्रँट यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याने बारामतीहून पुण्याला आणण्यात आले होते. पाच दिवसांच्या उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले होते. मात्र आज पुन्हा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# अमृतमहोत्सव भव्य-दिव्य होण्यासाठी सभासदांनी मार्गदर्शक सूचना कराव्यात

## मराठी वाङ्मय मंडळातर्फे आवाहन; २८ ला सभा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील नावलौकिक मराठी वाङ्मय मंडळ यंदा कारकिर्दीतील ७५ वर्षे यशस्वीरित्या पूर्ण करीत आहे. त्या अनुषंगाने अमृतमहोत्सव भव्य-दिव्य स्वरूपात साजरा करण्याचा मंडळाचा मानस आहे. अमृतमहोत्सवासाठी खानदेशातील सर्व सामाजिक, साहित्यिक व इतर शैक्षणिक संस्थांनाही सहभागी करून घेण्यात येणार आहे. त्यामुळे मंडळाच्या सभासदांनी शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सन २०२४-२०२५ वर्षाच्या होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून आपल्या बहुमोल मार्गदर्शक सूचना कराव्यात. आपल्या सूचनांमुळे अमृतमहोत्सवी कार्यक्रमांचे नियोजन करणे आम्हाला सुलभ होईल. सदर वार्षिक सर्वसाधारण सभा न्यू प्लॉट भागातील मंडळाच्या कै. रावसाहेब नांदेडकर सभागृहात दुपारी ४ वाजता होईल, असे मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी व कार्यवाह प्रा. श्याम पवार यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

दरम्यान, मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना १९५१ मध्ये झाली. तेव्हापासून आजवरच्या वाटचालीत १९५२ मध्ये ३५ वे तसेच २०२४ मध्ये ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यशस्वी करून दाखवत मंडळाची उपयुक्तता सिद्ध केली आहे. त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपत आजवर शारदीय व्याख्यानमालेसारखे विविध कार्यक्रम यशस्वीरित्या राबविले, ही मंडळासाठी अभिमानाची बाब आहे.

# लिंबू शंभरी पार!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह जिल्ह्यात फेब्रुवारी असूनही तापमानात बऱ्यापैकी वाढ झाली आहे. अशा स्थितीत किरकोळ बाजारात लिंबू चांगलेच भाव खाताना दिसत आहेत. बाजारात लिंबाची आवक घटत असताना सरबत विक्रेत्यांसह रसवंती गृहे, हॉटेल व्यवसायिक तसेच घरगुती ग्राहकांकडून मागणी वाढल्याने लिंबू विशेषतः किरकोळ बाजारात शंभरीपार गेला आहे.

येथील भाजीपाला बाजारात सध्या लिंबाची दैनंदिन सरासरी आवक केवळ तीन ते चार क्विंटलपर्यंत मर्यादित आहे. मागील आठवड्याच्या तुलनेत ही आवक कमी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. परिणामी बाजारात दर्जानुसार लिंबाला किमान १२० ते १६० रुपये प्रतिकिलोपर्यंत भाव मिळत आहे.

# नफ्याचे आमिष दाखवून डॉ. अनिल शिंदेंना दीड कोटीवर गंडा

## फेसबुकवर आलेली फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारल्यानंतर घडलेला प्रकार

**क्रिप्टो करन्सी ट्रेडिंग प्रकरण**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : क्रिप्टो करन्सी ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करून नफ्याचे आमिष दाखवून येथील डॉ. अनिल शिंदे यांची एक कोटी ६५ लाख ५७ हजार २०४ रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली आहे. हा प्रकार २९ जानेवारी ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान घडला आहे. डॉ. शिंदे यांच्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात झासी पाटील या महिलेसह तिच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फेसबुकवर आलेली फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारल्यानंतर हा प्रकार घडला.

डॉ. शिंदे यांना २९ जानेवारी रोजी झासी पाटील नावाच्या महिलेची फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट आली. ती त्यांनी स्वीकारल्यानंतर महिलेने एका इंटरनॅशनल ट्रेडिंगबद्दल माहिती दिली. ९ फेब्रुवारी रोजी महिलेने संपर्क साधून क्रिप्टो करन्सी ट्रेडिंगमध्ये मोठा नफा मिळेल, असे आमिष दाखविले. लिंक पाठवून ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. डॉ. शिंदे यांनी केलेल्या एकूण एक कोटी ६५ लाख ५७ हजार २०४ रुपयांच्या गुंतवणुकीतून तीन कोटी ९१ लाख ८७ हजार ७६६ रुपये नफा झाल्याचे त्यांना दिसत होते. ती रक्कम काढण्याविषयी त्यांनी सांगितले असता त्यासाठी कंपनीची २० टक्के व्हेरिफिकेशन फी म्हणून ६५ लाख ३१ हजार २९४ रुपये भरावे लागतील, असे सांगण्यात आले.

आता पैसे नसल्यानेच डॉ. शिंदे यांनी सांगत भरलेले पैसे परत मिळण्याची विनंती केली. मात्र उडवाउडवीची उत्तरे देत पैसे देण्यास संबंधितांकडून नकार देण्यात आला. त्यानंतर डॉ. शिंदे यांनी या प्रकरणी झासी पाटील व तिच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सतीश गोराडे पुढील तपास करीत आहेत.

# 'प्रताप'च्या हिंदी विभागातर्फे एकदिवसीय शैक्षणिक सहल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयाच्या हिंदी विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत ११ विद्यार्थी आणि हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. शशिकांत सोनवणे 'सावन', उपप्राचार्या प्रा. डॉ. कल्पना पाटील, सहाय्यक प्रा. के. पी. बागूल व किशोर सोनवणे असे ४ प्राध्यापक सहभागी झाले होते. सहलीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, सांस्कृतिक, साहित्यिक व भौगोलिक स्थळांची प्रत्यक्ष माहिती मिळवून देणे हा होता. विद्यार्थ्यांनी नाशिक यथील विश्वविख्यात त्रिरश्मी बुद्ध लेण्या, दादासाहेब फाळके स्मारक (चित्रनगरी), तसेच गंगापूर धरण या स्थळांना भेट दिली. विभागप्रमुखांनी या स्थळांचे आंतरराष्ट्रीय, ऐतिहासिक पर्यावरणीय महत्त्व आणि वैशिष्ट्ये समजावून सांगितली. सहभागी विद्यार्थ्यांनी निरीक्षण नोंदी करून महत्त्वपूर्ण माहिती संकलित केली. या सहलीमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवही मिळाला. साहित्य, कला, संस्कृती, प्रसार व मनोरंजन माध्यमांची व्याप्ती, तसेच या क्षेत्रातील रोजगार व नोकरी संबंधित विविध संधी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सहलप्रमुख म्हणून डॉ. कल्पना पाटील यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

प्र.- प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांनी सांगितले, की अशा शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात. सहलीनंतर सर्व विद्यार्थी सुरक्षितपणे परतले आणि त्यांनी आपले अनुभव उत्साहाने कथन केले. विद्यार्थ्यांनी ही सहल ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.



*अमळनेर : शैक्षणिक सहलीदरम्यान नाशिकमधील विश्वविख्यात त्रिरश्मी बुद्ध लेण्यांना भेटीप्रसंगी प्रताप महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक वृंद.*

## संपादकीय

# किमान दादांच्या मृत्यूचे तरी राजकारण होऊ नये

अजितदादा यांच्या दुर्दैवी अपघाती मृत्यूनंतरचा जो सारा काही राजकीय, सामाजिक आणि तपासाच्या निमित्ताने सुरू असलेला संशयाचा फेरा काही केल्या संपत नाही, असेच सध्या वातावरण आहे. कारण अजितदादा यांच्या विमानाला जो अपघात झाला तो केवळ अपघात नसून त्यामागे घातपाताची शक्यता रोहित पवार यांच्यासह अनेकांनी व्यक्त केली. ज्यामध्ये सर्वसामान्य कार्यकर्त्यांचाही समावेश आहे. आजही यातील संशय आणि आरोप तसेच सुरू आहेत. मात्र रोहित पवार यांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित करून अनेक प्रश्न समोर ठेवले आहेत. जे कोणाही या विषयातील तज्ज्ञ व्यक्तीला नाकारता येण्यासारखे नाहीत. किंबहुना ती वस्तुस्थिती तपासल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. रोहित पवार यांची पहिली पत्रकार परिषद झाली. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात एकदम निःशब्द शांतता पसरली. प्रत्येकजण अस्वस्थ झाला आणि खरोखर हा अपघात घातपात या विषयावर अनेकांच्या मनात कल्लोळ माजला. पण रोहित पवार यांनी परत दुसरी पत्रकार परिषद घेऊन जवळपास घेऊन आणखी काही मुद्दे मांडले आणि चित्र स्पष्ट केले आणि यामध्ये काही नावे घेऊन त्यांनी आरोप केले, की ज्यामध्ये व्हीएसआर कंपनीच्या मालकासह कंपनीमध्ये असलेली भागीदारी आणि अपघातग्रस्त विमानाचे काही तांत्रिक मुद्दे त्यांनी व्यवस्थित मांडले आणि यानंतर सुरू झाली ती घातपाताची आणि त्या पाठीमागे असलेल्या घाणेरड्या राजकारणाची चर्चा. या विमानाचा अपघात कसा झाला हा केवळ तांत्रिक मुद्दा तपासण्याचा विषय राहिला नसून तो आता घातपाताच्याच अँगलने तपासला जाण्याची शक्यता आहे. कारण जे मुद्दे उपस्थित होत आहेत ते अत्यंत संशयास्पद आहेत. या मुद्द्यांची उत्तरे अजून पुढे आलेली नाहीत. याबरोबरच अजितदादा यांच्या विमानाचा अपघात होण्याअगोदरचे काही दिवसांपूर्वीचा घटनाक्रम,अजितदादा यांच्या पक्षातील घडत असलेल्या घडामोडी त्यांनी केलेली वक्तव्ये आणि अपघातानंतरच्या त्याच पक्षातील झालेल्या घडामोडी या सर्वांची सांगड घालावी लागणार आहे.

रोहित पवार यांच्या म्हणण्याला दुजोरा अमित मिटकरी यांच्यासह अनेकजण देत आहेत. मूळ वादग्रस्त मुद्दा चर्चिला जातो आहे तो म्हणजे दोन राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाचा. नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित लढल्या. अर्थात महानगरपालिकांच्या निवडणुकीत मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. परंतु परत दोन्ही राष्ट्रवादी लगेचच एकत्र येऊन त्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती एकत्रित लढल्या खरंतर दोन्ही राष्ट्रवादी अशा पद्धतीने एकत्रित यावे ही गोष्ट कोणाला जास्त खटकत होती ? ही गोष्ट कोणाला पटत नव्हती ? यावर रोहित पवारांचा जो रोख आहे तो पाहणेही महत्त्वाचे आहे. राष्ट्रवादी पक्षाचे विलिनीकरणाचा मुद्दा हा अजितदादा हयात असतानाच झाल्याचा दावा शरद पवार पक्षाच्या अनेक नेत्यांनी केला ज्यामध्ये प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनीही याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना जवळपास १४ बैठका झाल्याची माहिती दिली होती. परंतु राष्ट्रवादीचे काही नेत्यांनी ही शक्यता सध्यातरी नसल्याचे सांगितल्यानंतर शरद पवार पक्षाच्या नेत्यांनीही आता यापुढे विलीनीकरण्याची बोलणी होणार नाही असे करून हा विषय तूर्तास तरी बंद करून ठेवला आहे. पण दुसऱ्या बाजूला रोहित पवार यांनी काही अशा गोष्टी समोर आणल्या आहेत की ज्यामुळे कोणाही महाराष्ट्रातील सामान्य व्यक्तीला सुद्धा संशय आहे. रोहित पवार हे दोन्ही पक्षांचे विलीनीकरणाच्या जोरदार समर्थनार्थ होते ही बाब आता काही लपून राहिली नाही. परंतु सुनील तटकरे व पटेल यांच्यामुळे सध्या तरी ते शक्य झाले नाही. मात्र रोहित पवार यांच्या पत्रकार परिषदेत आणि ज्या-ज्या वेळी त्यांनी अपघाताच्या वेळी माध्यमांशी चर्चा केली त्या-त्यावेळी त्यांनी अप्रत्यक्ष का होईना राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांवर ठपका ठेवलेला आहे. कदाचित अशीही शक्यता आहे, की पवार कुटुंबीय हे या ना त्या कारणाने म्हणजे कौटुंबिक सोहळा असो अथवा आत्ता अलीकडच्या निवडणुका असो एकत्र येत आहेत आणि मनोमीलन तर झालेले आहे फक्त राजकीय पातळीवरचे विलीनीकरण बाकी आहे. रोहित पवारांची वक्तव्ये, आरोप, संशय हे सारे काही करण्यामागे किंवा हे पुढे नेण्यामागे शरद पवार यांचा पाठिंबा असल्याशिवाय शक्य नाही.

दुसरी गोष्ट अशी, की अपघाताच्या घटनेनंतर अंत्यविधीपर्यंत प्रत्येकाची देहबोली जेव्हा अनेकांनी टीव्ही चॅनलवर पाहिली ती वेगळ्या स्वरूपाची होती. प्रत्येकाचा वावर आणि पक्षातील नेत्यांचाही वावर हा काहीतरी अधोरेखित करणारा होता. काहींचा अतिरिक्त वावर हा अनेकांना खटकत होता किंबहुना पटत नव्हता हे पण स्पष्टपणे जाणवत होते. अंत्यसंस्कार व अंत्यविधी झाल्यानंतर दोन दिवसांत ज्या पद्धतीने पुढील राजकीय घडामोडी घडल्या त्या कोणाला तशा अपेक्षित नव्हत्या किंबहुना नैतिकता आणि तात्विक मुद्द्यावर किमान काही दिवस राजकीय घडामोडी होऊ नयेत या मताचे अनेकजण होते. परंतु पक्षाचा डोलारा सांभाळण्यासाठी पुढे आलेच पाहिजे म्हणून सुनेत्राताई पवार यांच्याकडे पक्षाची कमांड देण्यात आली. अर्थात पवार कुटुंबियाच्याच व्यक्तींकडे पक्ष सध्या ही सूत्र असल्याने ती एक पवार कुटुंबियांना मानणाऱ्या अनेकांसाठी दिलासादायक बाब ठरली आहे. पण तरीही जे प्रश्न शिल्लक आहेत ज्यामध्ये अजितदादांचे काही निर्णय वा अलीकडच्या काही भूमिका कोणाला मान्य नव्हत्या? या सर्वांची उत्तरे तपासावी लागणार आहेत. रोहित पवार यांनी आपल्या दुसऱ्या पत्रकार परिषदेमध्ये व्हीएसआर कंपनीचे मालक सिंग यांच्याबद्दल जे प्रश्न उपस्थित केले आहेत आणि महत्त्वाचा म्हणजे ब्लॅक बॉक्स हा जळाला कसा हा पण मुद्दा पुढे आणला आहे हे दोन्ही मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आहेत. या मुद्द्यांमधूनच अनेक उत्तरे सापडणार आहेत. पायलटने विमान जाणून-बुजून पाडला हा रोहित पवारांच्या दाव्याला आणि आरोपाला या ब्लॅक बॉक्समधून खुलासा होणार आहे. पण निश्चित काहीतरी घडलं आहे हे मात्र आता कोणीही नाकारणार नाही. हे सारे काही सामान्य जनतेच्या आकलना पलीकडचा आहे. सध्या महाराष्ट्रात संशयाचे, अविश्वासाचे वातावरण आहे. कोणतीही आश्वासक गोष्टी घडताना दिसत नाही. रोज काही ना काहीतरी तणावपूर्ण आणि नको वाटणाऱ्या गोष्टी या राज्यामध्ये घडत आहेत. महाराष्ट्राचा राजकारण एकेकाळी पूर्ण देशासाठी आदर्श आणि नितिमत्तेचा धडा देणारे होते, पण आता असे शब्द उच्चारणाची आणि वापरण्याची हिंमत कोण करणार नाही. अजित पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर महाराष्ट्र अस्वस्थ आहे, कधी नव्हे एवढी एक प्रकारची अप्रत्यक्ष निराशेची लाट आली आहे.या बॉक्सचे जेव्हा झाकण उघडेल तेव्हा खऱ्या अर्थाने अनेकांचे खरे चेहरे उघडे पडणार आहेत आणि विकृत राजकारणही समोर येणार आहे मात्र हे सारं होण्यासाठी, त्याचा हिमतीने पाठपुरावा कोणीतरी करावा लागणार आहे तेवढं धाडस आता कोणाच्या आहे का हा सुद्धा अनुत्तरीत असलेला प्रश्न आहे.

# शौर्याचा तेजस्वी दीप : शहीद अशोक कामटे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जन्मदिन विशेष

भारताच्या इतिहासातील काळ्याकुट्ट पण तितक्याच शौर्यगाथांनी उजळलेला दिवस म्हणजे २६ नोव्हेंबर २००८. मुंबईवर झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात अनेक निष्पाप नागरिकांसह धाडसी पोलीस अधिकारी शहीद झाले. त्यात एक पराक्रमी, कर्तव्यनिष्ठ आणि निर्भीड अधिकारी म्हणजे अशोक कामटे. त्यांचा २३ फेब्रुवारी रोजी जन्मदिवस. यानिमित्त त्यांच्या शौर्यपूर्ण कार्याचे स्मरण करून राष्ट्र कृतज्ञतापूर्वक अभिवादन करते.

**कर्तव्यनिष्ठ अधिकारी**

अशोक कामटे यांचा जन्म २३ फेब्रुवारी १९६५ रोजी झाला. ते भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) १९८९ च्या तुकडीतील अधिकारी होते. ते महाराष्ट्र कॅडरमध्ये कार्यरत होते. कर्तव्याप्रती निष्ठा, तडफदार निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुण यामुळे त्यांनी अल्पावधीतच वेगळी ओळख निर्माण केली. ते शांत, संयमी पण प्रसंगी कठोर भूमिका घेणारे अधिकारी म्हणून ओळखले जात. त्यांनी महाराष्ट्रातील विविध भागांत जबाबदारीची पदे सांभाळली. गुन्हेगारीविरोधी कारवाई, कायदा-सुव्यवस्था राखणे आणि सामाजिक सलोखा जपणे या बाबतीत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

**२६/११ : धैर्याची पराकाष्ठा**

२६ नोव्हेंबर २००८ रोजी दहशतवाद्यांनी मुंबईत समन्वित हल्ले केले. या भीषण हल्ल्याच्या घटनेने अवघे मुंबई शहर हादरून गेले. त्यावेळी अशोक कामटे अतिरिक्त पोलीस आयुक्त (पूर्व विभाग) म्हणून कार्यरत होते. हल्ल्याची माहिती मिळताच त्यांनी तातडीने कारवाई सुरू केली. दहशतवाद्यांचा पाठलाग करताना त्यांनी निर्भयपणे पुढाकार घेतला. या कारवाईदरम्यान ते अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत अग्रभागी होते. कर्तव्य बजावत असताना त्यांनी वीरमरण पत्करले. त्यांच्या बलिदानामुळे देशाला त्यांच्या धैर्याची जाणीव झाली.

**शौर्याचा गौरव**

अशोक कामटे यांच्या अतुलनीय शौर्यासाठी त्यांना मरणोत्तर अशोक चक्र या देशातील सर्वोच्च शांतिकालीन शौर्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचे बलिदान हे केवळ एका अधिकाऱ्याचे नव्हते, तर राष्ट्रासाठी प्राणार्पण करणाऱ्या योद्ध्याचे होते.

**कुटुंब आणि प्रेरणा**

त्यांच्या पश्चात पत्नी विनिता कामटे आणि कुटुंबियांनी त्यांचा वारसा जपला आहे. त्यांच्या पत्नीने त्यांच्या शौर्यकथेचा अभ्यास करून जनतेसमोर सत्य मांडण्याचे कार्य केले. अशोक कामटे यांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेदेशसेवा, निष्ठा आणि धैर्य यांचे मूर्तिमंत उदाहरण.

### जन्मदिनानिमित्त कृतज्ञ स्मरण

अशोक कामटे यांचा जन्मदिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर देशभक्तीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. त्यांच्या जीवनातून आपल्याला शिकायला मिळते की संकटसमयी धैर्य, समर्पण आणि निःस्वार्थ वृत्तीच माणसाला महान बनवते. शहीद अशोक कामटे यांचे बलिदान भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आपण सर्वांनी राष्ट्रसेवेचा, प्रामाणिकतेचा आणि कर्तव्यनिष्ठेचा संकल्प करूया.

त्यांना

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन!**

**'देशासाठी जगणे आणि मरणे, हेच खरे शौर्य.'**




*अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), इतिहास विभाग व इतिहास संशोधन केंद्र, अमळनेर आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी कबचौ उमवि संचलित प्रताप तत्त्वज्ञान केंद्रात मानव्य विद्याशाखेंतर्गत झालेल्या समाजशास्त्रीय संशोधन पद्धती या विषयावरील कार्यशाळेत बोलताना प्रा. डॉ. कविता तातेड. शेजारी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, माजी प्राचार्य डॉ. अरुण जैन, प्रा. डॉ. रावसाहेब नेरकर आदी.*

# अमळनेरमध्ये समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

## विविध मान्यवरांचे व्याख्यानातून मार्गदर्शन; 'प्रताप'च्या इतिहास विभागाचा उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), इतिहास विभाग व इतिहास संशोधन केंद्र, अमळनेर आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार रोजी कबचौ उमवि संचलित प्रताप तत्त्वज्ञान केंद्र, अमळनेर येथे मानव्य विद्याशाखेंतर्गत समाजशास्त्रीय संशोधन पद्धती या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यात विविध मान्यवरांची व्याख्याने झाली. प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी, प्रमुख अतिथी म्हणून प्रताप महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अरुण जैन, तर प्रमुख वक्ते म्हणून यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. कविता राजेंद्र तातेड तसेच प्रताप तत्त्वज्ञान केंद्राच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. राधिका मोहन पाठक आणि पारोळ्यातील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. रावसाहेब नेरकर व्यासपीठावर होते. कार्यक्रमाला प्रताप कॉलेजचे रुसा, आयक्यूएसी आणि नॅकचे प्रमुख समन्वयक प्रा. डॉ. मुकेश भोळे तसेच प्रा. डॉ. संदीप नेरकर, प्रा. हिमांशू गोसावी, प्रताप तत्त्वज्ञान केंद्राचे प्रशासकीय अधिकारी साळुंखे, गोपाळभाऊ, प्रा. हालोर आणि इतिहास विभाग व इतिहास संशोधन केंद्रप्रमुख, विभागप्रमुख प्रा. डॉ. धनंजय चौधरी, प्रा. विजय साळुंखे, प्रा. अवित पाटील, प्रा. प्रियंका चावडा, इतिहास आणि प्रताप कॉलेजचे विविध विभागांतील प्राध्यापक आणि विद्यार्थी, संशोधक उपस्थित होते.

प्रमुख वक्त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एनईपीमध्ये संशोधनास पुढील काळात असलेले महत्त्व लक्षात घेऊन सर्व संशोधन क्षेत्रातील बारकावे पीपीटीच्या माध्यमाने माहिती करून देण्याचा उत्तम प्रयत्न केला. संशोधन शीर्षक, साहित्याचे पुनर्विलोकन, संशोधन निबंध, प्रबंध पुनर्विलोकन, शोधनिबंध, तळटिपा, आराखडा, संशोधन पायऱ्या, माहिती संकलन, विश्लेषण, वर्गीकरण, अन्वयार्थ, तक्ते, प्रकरण लिखाण, संदर्भ सूची इत्यादी मुद्द्यांवर मान्यवरांनी प्रकाश टाकला. इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. तातेड यांनी प्रास्ताविक केले. तंत्रसहाय्यक प्रा. विजय साळुंखे, प्रा. प्रसाद मुठे यांनी परिचय करून दिला.

महाविद्यालय आणि तत्त्वज्ञान केंद्रातील मानद संचालक प्रा. डॉ. मनीष करंजे, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग, विद्यार्थी, संशोधक यांनी कार्यशाळा यशस्वितेसाठी मोलाचे सहकार्य केले. प्रा. अवित पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रियंका चावडा यांनी आभार मानले.

# पाकीटबंद पदार्थ खाणे कॅन्सरला निमंत्रण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताला मधुमेह, स्थौल्य, थायरॉईड, वंध्यत्व, हृदयरोग याची जागतिक राजधानी बनवायची नसेल, सध्याची आणि येणाऱ्या पिढ्या वाचवायच्या असतील तर चिप्स, स्टिक, वेफर, प्रोसेस्ड फूड याच्या खाण्यावर नियंत्रण ठेवायला हवे. कुरकुरे, चिप्स आणि इतर पाकीटबंद स्नॅक्स आजकाल मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या आहाराचा भाग झाले आहेत. मात्र वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले तर हे पदार्थ आरोग्यासाठी गंभीर दुष्परिणाम करणारे ठरू शकतात. मुले किरकिर करतात म्हणून ५-१० रुपयांची पाकिटे सहज त्यांच्या हातात देतो. पण हे किती घातक आहे याचा विचार आपण करू शकत नाही. कुरकुरे व चिप्समध्ये सोडियमचे प्रमाण खूप जास्त असते. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार प्रौढ व्यक्तीने दिवसाला ५ ग्रॅमपेक्षा कमी मीठ खावे. जास्त मिठामुळे उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. लहान वयातच जास्त मिठाची सवय लागल्यास भविष्यातील हृदयविकाराची शक्यता वाढते. अनेक पाकीटबंद पदार्थ तळलेले किंवा हायड्रोजनेटेड तेलात बनविलेले असतात. ट्रान्स फॅटमुळे वाईट कोलेस्टेरॉल वाढते आणि चांगले कोलेस्टेरॉल कमी होते. त्यामुळे आथेरोस्क्लेरोसिस (रक्तवाहिन्यांमध्ये चरबी साचणे) होऊ शकते. उच्च तापमानात तळलेल्या बटाट्याच्या पदार्थांमध्ये ॲक्रिलामाइड नावाचे रसायन तयार होऊ शकते. संशोधनानुसार हे संभाव्य कर्करोगकारक मानले जाते. वारंवार सेवन केल्यास दीर्घकालीन आरोग्यचा धोका वाढू शकतो. पाकीटबंद स्नॅक्समध्ये कृत्रिम रंग, फ्लेवर्स आणि प्रिझर्व्हेटिव्ह असतात. काही मुलांमध्ये यामुळे ॲलर्जी, त्वचेचे विकार किंवा अतिचंचलता वाढल्याचे आढळून आले आहे. हे पदार्थ हाय कॅलरी, लो न्यूट्रिएंट नियमित सेवन केल्यास लठ्ठपणा, टाइप २ मधुमेह आणि मेटाबॉलिक सिंड्रोमचा धोका वाढतो. चव तात्पुरती असते. पण आरोग्य कायमचे असते.



# कर्जमाफी योजनेचे निकष बदलून नियमित कर्ज फेडणाऱ्यांना लाभ द्या

## जिल्हा किसान काँग्रेसचे अध्यक्ष पाटील यांची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर (प्रतिनिधी) शासन राबवत असलेली कर्जमाफी सदोष असून त्याचे निकष बदलवून नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ व्हायला पाहिजे. यात नियमित शेतकऱ्यांना 50 हजार ते 1 लाख रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मागणी जिल्हा किसान काँग्रेसचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी जिल्हा बँक तथा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की शासन शेतकरी हिताची कर्जमाफी योजना राबवत असताना दरवेळी ठराविक शेतकरी थकबाकीदार राहून योजनेचा लाभ घेतात आणि प्रामाणिक शेतकरी प्रत्येकवेळी कर्ज फेडतात. त्यामुळे ही कर्जमाफी सदोष असून त्याचे निकष बदलून नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ व्हायला पाहिजे. कारण ग्रामीण भागातील विविध कार्यकारी सोसायट्या आणि जिल्हा बँक या फक्त प्रामाणिक कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांमुळे तग धरून आहेत. दरवर्षी थकबाकीदार राहून प्रत्येकवेळी कर्जमाफीचा लाभ घेणाऱ्यांमुळे आज सुमारे ५०० सहकारी संस्था लिक्विडेशनमध्ये आल्या आहेत. जर सर्वच शेतकऱ्यांनी कर्ज माफीच्या हेतूने कर्ज फेड करणे बंद केले तर या सर्व सहकारी संस्था कोलमडतील. शासनच आता शेतकऱ्यांना थकबाकीदार होण्यासाठी प्रवृत्त करत आहे. शासनाने नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचे जाहीर केले होते. मात्र तांत्रिक कारणामुळे निधी अभावी हा लाभ मिळलेला नाही. त्यामुळे नियमित शेतकऱ्यांना ५० हजार ते एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे. अशा शेतकऱ्यांना भविष्यात शून्य टक्के व्याजासोबत कर्जाची मर्यादा वाढवून देण्यात यावी, प्रामाणिक शेतकऱ्यांसाठी सन्मान योजना राबवून खते, बियाणे किंवा विमा हप्त्यात सवलत योजना देण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. जर प्रामाणिक शेतकऱ्यांची अशीच उपेक्षा होत राहिली, तर भविष्यात आम्हालाही कर्ज फेड रोखण्याशिवाय पर्याय राहणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनावर सुरेश पिरन पाटील, दिनेश पवार, कैलास पाटील, भालचंद्र शेलकर, प्रताप पाटील, सुनील पाटील आदी पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

## टी-२० वर्ल्ड कप २०२६

# भारतातर्फे गेमचेंजर ठरलेल्या मॅचविनरची दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार 'एन्ट्री'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टी-२० वर्ल्ड कप २०२६ चा सुपर ८ फेरीमधील भारतीय संघाचा पहिला सामना दक्षिण आफ्रिकेसोबत होत आहे. त्यात दक्षिण आफ्रिका संघाचे आव्हान भारतासमोर असणार आहे. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये हा सामना होणार आहे. या महत्त्वाच्या सामन्यात भारतीय संघात बदल पाहायला मिळण्याची दाट शक्यता आहे. कोणत्या खेळाडूची एन्ट्री होणार आणि कोणाला बाहेर बसावे लागणार ते जाणून घेऊया.

कर्णधार सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी टी-२० क्रिकेट वर्ल्ड कप स्पर्धेतील गट लढतीतील चारही सामन्यांत फटकेबाजीपेक्षाही भारतीय संघाच्या डावाला आकार देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आज रंगणाऱ्या 'सुपर ८' फेरीतील दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या लढतीतही या दोघांकडे ही जबाबदारी असेल.

**भारतीय संघात एकमेव बदल**

नेदरलँडविरूद्ध भारताने जो संघ उतरवला होता, त्यामध्ये एकमेव बदल होण्याची शक्यत आहे. तो बदल म्हणजे उपकर्णधार अक्षर पटेल याला त्या सामन्यामध्ये विश्रांती देण्यात आली होती. मात्र आता त्याला पुन्हा एकदा संघामध्ये घेतले जाणार आहे. इतर कोणताही बदल भारत करताना दिसणार नाही. वॉशिंग्टन सुंदर याला बाहेर बसावे लागणार आहे. वर्ल्ड कप २०२४ च्या फायनलमध्ये अक्षर पटेल याने मिडल आर्डरला खेळायला येत दमदार खेळी केली होती. त्यासोबतच त्याने महत्त्वाच्या वेळी कॅच पकडला होता.

संभाव्य भारतीय संघ : अभिषेक शर्मा, इशान किशन, तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, हार्दिक पांड्या, रिंकू सिंग, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह आणि वरुण चक्रवर्ती.

सलामीवीर अभिषेक शर्मा सूर हरवून बसल्याने संघव्यवस्थापनाने ही नवी रणनीती आखली असून सूर्या आणि तिलक त्यांची अंमलबजावणी करत आहेत. दक्षिण आफ्रिकेसारख्या आव्हानात्मक, कडव्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध तिलक आणि सूर्या यांच्या गुणवत्तेचीही खरी परीक्षा असेल. कागिसो रबाडा, लुंगी एनगिडी, मार्को यानसेन, केशव महाराज आणि एडन मार्करम अशा मजबूत गोलंदाजी आक्रमणासह दक्षिण अर्थातच सज्ज आहे. आफ्रिका अर्थातच सज्ज आहे.अभिषेक शर्मा सलग तीन सामन्यांत शून्यावर बाद झाला आहे. त्याचा वर्ल्ड कप धावांचाही अद्याप श्रीगणेशा झालेला नाही. सूर्यकुमार आणि तिलक यांनी जरी सूत्रधाराची भूमिका बजावली असली, तरी ज्या खेळपट्ट्यांवर चेंडू थांबून येत होता त्यावर त्यांच्याकडूनही सहज कामगिरी झालेली नाही.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# मोहक हास्याने घायाळ करणारी मधुबाला



स्मृतिदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेव्हा हिंदी चित्रपटसृष्टीतील सौंदर्याविषयी चर्चा रंगते तेव्हा मधुबाला हे नाव अग्रस्थानी असते. मधुबाला या हिंदी चित्रपटसृष्टीतील एक आघाडीच्या अभिनेत्री नव्हत्या तर त्या भारतीय सौंदर्याचा मापदंड होत्या. जाणकारांच्या मते त्यांच्याइतकी सुंदर अभिनेत्री त्यांच्या आधीही व त्यांच्यानंतरही हिंदी चित्रपटसृष्टीत झाली नाही. सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी त्यांचा स्मृतिदिन. त्यानिमित्त...

अलौकिक सौंदर्याचे देणे लाभलेल्या आणि विलक्षण अभिनय क्षमतेच्या मधुबाला यांनी बॉम्बे टॉकीजच्या बसंत (१९४२) या चित्रपटातून बेबी मुमताज या नावाने रूपेरी पडद्यावर पदार्पण केले. याच चित्रपटात मेरे छोटेसे मनमे छोटीसी दुनिया रे हे गाणे पडद्यावर गाऊन भरपूर टाळ्याही घेतल्या होत्या. बसंतनंतर सहा चित्रपटांतून बालकलाकार म्हणून काम करताना त्यांनी आपल्या अभिनयाची चुणूक दाखवायला सुरूवात केली होती. बेबी मुमताज यांचे सौंदर्य पाहून अभिनेत्री देविकारानी फारच प्रभावित झाल्या आणि त्यांनी त्यांचे नाव बदलून मधुबाला ठेवले. तथापि, १९४७ ला प्रदर्शित झालेल्या नीलकमल या राजकपूर नायक असलेल्या चित्रपटाने त्यांना व्हीनस ऑफ स्क्रीन केले आणि त्यानंतर जवळजवळ दीड शतक त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीवर राज्य करताना लोकप्रियतेचे अत्युच्च शिखर गाठले. १९४९ साली आलेल्या कमाल अमरोहीच्या महलमध्ये आएगा, आएगा, आएगा आनेवाला या गाण्यामुळे मधुबाला व लता मंगेशकर दोघीही प्रकाशझोतात आल्या.

मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी असलेल्या मधुबालाचा जन्म दिल्ली येथे १४ फेब्रुवारी १९३३ साली एका पश्तून मुस्लीम परिवारात झाला. मधुबाला या अयातुल्लाह खान यांच्या अकरा अपत्यांपैकी पाचवे. मधुबालाच्या जन्मानंतर एका ज्योतिषाने ही मुलगी मोठी झाल्यावर देश-विदेशात ख्यातनाम होईल. अगणित संपत्ती मिळवेल. पण त्यांचे स्वतःचे जीवन मात्र दुःखमय राहील, असे भविष्य वर्तविले होते.

यानंतर मधुबालाच्या वडिलांनी कामाच्या शोधात मुंबई गाठली. मुंबईला आल्यावर खानांनी अनेक प्रकारचे कष्ट केले. दरम्यान त्यांच्या तीन मुली आणि दोन मुले मृत्युमुखी पडली तसेच गोदीत झालेल्या स्फोटामुळे लागलेल्या आगीने त्यांचे घर आणि सामान जळून खाक झाले. घरातील सर्व जण तेव्हा बाहेर असल्यामुळे बचावले.

आपल्या मोहक हास्याने आणि भावोत्कट अभिनयाने तीन पिढ्यांना घायाळ केलेल्या मधुबालाने ७० हून अधिक हिंदी चित्रपटांतून भूमिका साकारल्या. महल, बरसात की एक रात, चलती का नाम गाडी, मिस्टर अँड मिसेस ५५, काला पानी, मुगल-ए-आझम आदी चित्रपटातील त्यांच्या भूमिका आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. रसरशीत आणि उत्साही सौंदर्याचे प्रतीक असलेल्या मधुबालाच्या अभिनयाचे मास्टर स्ट्रोक रसिकांच्या हृदयात शिल्पासारखे कोरले आहेत. मधुबालाने तत्कालीन प्रसिद्ध अभिनेते अशोक कुमार, राजकुमार, दिलीपकुमार, सुनील दत्त, देव आनंद, शम्मी कपूर आदींसोबत काम केले असून, गीता बाली, सुरैया, निम्मी आदी प्रसिद्ध नायिकांसोबतही अभिनय केला आहे, तर महलोके ख्वाब या चित्रपटाची निर्मितीही केली आहे.

१९५० ते १९५७ पर्यंतचा काळ मधुबालासाठी थोडासा वाईट होता. या दरम्यान तिचे अनेक चित्रपट अयशस्वी झाले. मात्र, त्यानंतर १९५८ मध्ये आलेले फागुन, हावडा ब्रीज, कालापानी आणि चलती का नाम गाडी या चित्रपटांमुळे मधुबाला पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या झोतात आली. हावडा ब्रीजमधील मधुबालाने साकारलेली एका क्लब डान्सरची भूमिका फारच गाजली. या चित्रपटातील त्यांच्या अदांनी प्रेक्षक घायाळ झाले होते. तर यानंतर आलेल्या चलती का नाम गाडी या चित्रपटात आपल्या अभिनयाने त्यांनी प्रेक्षकांना खळखळून हसवले होते. मधुबाला आणि दिलीपकुमार ही जोडी प्रेक्षकांनी सर्वाधिक पसंत केली. तराना चित्रपटाच्या चित्रीकरणावेळी मधुबाला आणि दिलीपकुमार यांच्यातील प्रेमाचे सूर जुळू लागले होते. तथापि, मधुबालांचे वडील अताऊल्लाखान यांना हे प्रेम मान्य नसल्याने ते पूर्णत्वास जाऊ शकले नाही.

त्यानंतर मुघल-ए-आझम या चित्रपटाच्या चित्रीकरणावेळी मधुबालाची प्रकृती खूपच बिघडली. आपल्या सौंदर्याची आणि आरोग्याची काळजी राखण्यासाठी मधुबाला घरात उकळलेल्या पाण्याशिवाय काहीच खात-पित नव्हत्या. मात्र जैसलमेरच्या वाळवंटातील चित्रीकरण त्यांना मानवले नाही. शिवाय मधुबालांच्या शरीरावर जड लोखंडाचे साखळदंडही लादण्यात आले होते. मात्र या पूर्ण काळात मधुबालांनी एकदाही तक्रार केली नाही आणि चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण केले.

१९६० मध्ये मुघल-ए-आझम प्रदर्शित झाला आणि पहिल्या दिवसापासूनच दर्शकांनी मधुबालांचा अभिनय डोक्यावर घेतला. आजही मधुबालांचे नाव घेतले की अनेकांच्या तोंडी पहिला चित्रपट मुघल-ए-आझमच येतो. ६० च्या दशकात मधुबालांनी चित्रपटात काम करणे खूपच कमी केले. चलती का नाम गाडी आणि झुमरू चित्रपटाच्या चित्रीकरणावेळी किशोरकुमार आणि मधुबाला भावनिकरित्या फार जवळ आले होते. याचवेळी अताऊल्लाह खान यांनी किशोकुमार यांना मधुबाला उपचारांसाठी लंडनला जात असून, परतल्यावर दोघे लग्न करू शकतात, असे सांगितले.

तथापि, मधुबाला यांना आपल्या आजाराची चाहूल लागल्याने मधुबालांची इच्छा पूर्ण करण्यासाठी किशोरकुमार यांनी त्यांच्याशी लग्न केले. मात्र मधुबालांची प्रकृती बिघडत गेली.

यावेळी त्यांचे पासपोर्ट, झुमरू, बॉयफ्रेंड, हाफ तिकट (१९६१-१९६२) आणि शराबी (१९६४) हे चित्रपट प्रदर्शित झाले. तथापि, १९६४ मध्ये मधुबाला यांनी पुन्हा जोमाने काम करायला सुरूवात केल्यानंतर चालाक चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या पहिल्याच दिवशी त्या सेटवर बेशुद्ध पडल्या आणि हा चित्रपट बंद करावा लागला. चित्रपट जगतातील मधुबाला यांच्या प्रवास खूप कमी काळाचा ठरला. केवळ ३६ वर्षांच्या असताना २३ फेब्रुवारी १९६९ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र आदरांजली.

# स्वच्छता, सेवा आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्थान : संत गाडगे महाराज



## आजच्या काळातील प्रेरणा

*आजच्या आधुनिक युगात विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती झाली असली तरी सामाजिक समस्यांचे स्वरूप बदललेले नाही. अस्वच्छता, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. अशा वेळी संत गाडगे महाराजांचे विचार अत्यंत मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण स्वच्छतेची सवय लावणे, अंधश्रद्धा टाळणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि गरजूंची मदत करणे हा खरा श्रद्धांजलीचा मार्ग ठरू शकतो. संत गाडगे महाराजांचे जीवन म्हणजे त्याग, सेवा आणि प्रामाणिकपणाचे प्रतीक आहे. त्यांनी दिलेला स्वच्छतेचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण प्रत्येकाने 'स्वतः बदलू आणि समाज बदलू' हा संकल्प करणे हीच त्यांना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे खरी आदरांजली ठरेल. 'सेवा हाच खरा धर्म, स्वच्छता हीच खरी पूजा' हा त्यांचा संदेश आपल्या कृतीतून जपूया.*

जयंती विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या संतपरंपरेत अनेक थोर संतांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्या परंपरेतील एक तेजस्वी नाव म्हणजे संत गाडगे महाराज. स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणप्रसार आणि मानवसेवा या मूल्यांचा जागर करून त्यांनी समाजात जागृती घडवून आणली. त्यांची २३ फेब्रुवारी रोजी जयंती. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा व विचारांचा आढावा घेणे म्हणजे समाजाला नव्याने दिशा देणे होय.

**जन्म व प्रारंभिक जीवन**

संत गाडगे महाराज यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. त्यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. लहानपणापासूनच त्यांना अन्याय, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांची चीड होती. समाजातील दुःख, गरिबी आणि अस्वच्छता पाहून त्यांच्या मनात परिवर्तनाची ज्वाला प्रज्वलित झाली.

**स्वच्छतेचा संदेश**

संत गाडगे महाराज गावोगावी फिरून कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करीत असत. कीर्तनासाठी गावात गेल्यावर ते प्रथम गाव साफ करीत. हातात झाडू घेऊन रस्ते, गटारे आणि देवळाभोवतालचा परिसर स्वच्छ करत. त्यांचा ठाम संदेश होता 'स्वच्छता हीच खरी पूजा.' त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढे देशभर दिसून आला. आज स्वच्छ भारत अभियानासारख्या उपक्रमांमध्ये त्यांच्या कार्याची प्रेरणा दिसून येते.

**शिक्षण व सामाजिक सुधारणा**

संत गाडगे महाराजांनी शिक्षणाला प्रचंड महत्त्व दिले. त्यांनी समाजातील गरीब व वंचित घटकांसाठी धर्मशाळा, वसतिगृहे आणि शाळा उभारल्या. त्यांनी लोकांना सांगितले की, देवाला सोन्याचे दागिने अर्पण करण्यापेक्षा गरिबांच्या शिक्षणासाठी मदत करा. त्यांनी अंधश्रद्धा, जातीभेद, व्यसनाधीनता आणि दिखाऊ धार्मिकतेवर कठोर टीका केली. त्यांच्या कीर्तनातून ते लोकांना वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारण्याचे आवाहन करत.

**मानवतेचा खरा धर्म**

संत गाडगे महाराजांनी कधीही कीर्तनातून मिळालेली देणगी स्वतःसाठी वापरली नाही. ती रक्कम समाजोपयोगी कार्यासाठी खर्च केली. त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. अंगावर फाटकी वस्त्रे, पायात चप्पल नाही, हातात झाडू आणि डोक्यावर माठ अशी त्यांची प्रतिमा आजही लोकांच्या स्मरणात आहे. त्यांनी शिकवले, की 'खरा धर्म म्हणजे माणुसकी.' जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी मानवतेचा संदेश दिला.

# जागतिक शांतता व समज दिन : मानवतेच्या ऐक्याचा संदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २३ फेब्रुवारी रोजी जगभरात वर्ल्ड अंडरस्टँडिंग ॲण्ड प्लेस डे साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नसून मानवतेतील ऐक्य, बंधुभाव, सहिष्णुता आणि परस्पर समज वाढविण्याचा संकल्प दिवस आहे. विविध देश, भाषा, संस्कृती आणि धर्म असले तरी 'वसुधैव कुटुंबकम्' या विचाराने संपूर्ण जग एक कुटुंब आहे, ही जाणीव दृढ करण्याचा हा प्रयत्न आहे.

**दिनाचे महत्त्व आणि पार्श्वभूमी**

हा दिवस प्रामुख्याने रोटरी इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्थेच्या स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. २३ फेब्रुवारी १९०५ रोजी या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवा, आरोग्य, शिक्षण, आपत्ती निवारण आणि शांततेसाठी कार्य करणे हा तिचा मूलमंत्र आहे. जागतिक स्तरावर संघर्ष, युद्ध, दहशतवाद, सामाजिक असमानता आणि पर्यावरणीय संकटे यामुळे शांततेचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व आजच्या काळात अधिकच वाढले आहे.

**शांतता का आवश्यक?**

शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नव्हे, तर सामाजिक न्याय, समान संधी, परस्पर आदर आणि संवाद यांची उपस्थिती होय. समाजात जर समज, सहकार्य आणि सहिष्णुता असेल, तरच खरी प्रगती शक्य आहे. आजच्या डिजिटल युगात माहितीचा प्रसार वेगाने होत असला तरी गैरसमज, अफवा आणि द्वेषपूर्ण प्रचार यामुळे तणाव निर्माण होतो. अशा वेळी परस्पर संवाद, संयम आणि विवेकबुद्धी यांची गरज अधिक असते.

**समजुतीचा सेतू**

जागतिक शांतता व समज दिन आपल्याला शिकवतो की विविधतेतून एकता साधणे हेच खरे सामर्थ्य आहे. भाषा, धर्म, संस्कृती यांतील भिन्नता स्वीकारून परस्पर आदर ठेवणे हीच खरी प्रगती आहे. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांनी या दिवशी चर्चासत्रे, व्याख्याने, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून शांततेचा संदेश द्यावा.



## आपण काय करू शकतो?

- विविध धर्म आणि संस्कृतींचा आदर करणे
- मतभेदांवर संवादाने तोडगा काढणे
- सामाजिक सलोखा राखण्यासाठी सक्रिय सहभाग घेणे
- पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करणे
- गरजू व वंचित घटकांना मदत करणे
- शांतता ही केवळ सरकारे किंवा आंतरराष्ट्रीय संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची आहे.

जागतिक शांतता व समज दिन हा मानवतेच्या ऐक्याचा आणि परस्पर सन्मानाचा संदेश देणारा दिवस आहे. जग अधिक सुरक्षित, समृद्ध आणि आनंदी व्हावे, यासाठी प्रत्येकाने शांततेचा दीप आपल्या अंतःकरणात प्रज्वलित करणे गरजेचे आहे. 'शांतता हीच खरी शक्ती, समज हीच खरी प्रगती,' या विचाराने आपण सर्वांनी जागतिक बंधुभावाचा संकल्प करूया.

तरुण पिढीमध्ये जागतिक नागरिकत्वाची भावना रुजवणे अत्यंत आवश्यक आहे.

**आजच्या काळातील आव्हाने**

जगभरात वाढते पर्यावरणीय संकट, आर्थिक विषमता, युद्धजन्य परिस्थिती आणि सांस्कृतिक संघर्ष ही शांततेसमोरील मोठी आव्हाने आहेत. या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य, संवाद आणि मानवतावादी दृष्टिकोन आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात सहिष्णुता, संयम आणि परस्पर आदर पाळल्यास जागतिक शांततेचा पाया अधिक मजबूत होईल.

# एक नहीं, बल्कि लगातार ३ बार क्रैक की यूपीएससी परीक्षा

## पहले आयपीएस फिर बने आयएएस अफसर



सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत की सबसे कठिन यूपीएससी सिविल सेवा परीक्षा पास करना किसी भी शख्स के लिए आसान नहीं है. लेकिन आज हम आपको एक ऐसे शख्स के बारे में बताएंगे, जिन्होंने यह परीक्षा एक नहीं, बल्कि लगातार ३ बार क्रैक की है. वह पहले आयपीएस और फिर आयएएस अफसर बनें।

अगर देश की सबसे कठिन परीक्षा की बात होती है, तो सबसे पहले नाम आता है यूपीएससी की सिविल सेवा परीक्षा का। इस परीक्षा को पास करना बेहद कठिन माना जाता है। हर साल लाखों उम्मीदवार इस परीक्षा में शामिल होते हैं, लेकिन बहुत कम लोग ही सफल हो पाते हैं। ऐसे में आईएएस अफसर कार्तिक जिवानी की कहानी मेहनत, धैर्य और मजबूत इरादों की मिसाल है, जो हर यूपीएससी उम्मीदवार को जाननी चाहिए।

**शुरुआत में मिली असफलता**

दरअसल, कार्तिक जिवानी का सपना शुरू से आईएएस अधिकारी बनने का था। इसके लिए उन्होंने सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू की, लेकिन पहले प्रयास में उन्हें असफलता हाथ लगी। हालांकि, उन्होंने हार नहीं मानी। उन्हें समझ आ गया कि अगर पूरी मेहनत और फोकस के साथ तैयारी की जाए, तो बड़ी सफलता हासिल की जा सकती है।

**२०१७ में हासिल की ९४ वीं रैंक, बने आयपीएस**

इसके बादल कड़ी मेहनत और लगन के साथ कार्तिक ने दोबारा परीक्षा दी। साल २०१७ में उन्होंने ऑल इंडिया ९४ वीं रैंक हासिल की। इस रैंक के साथ उनका चयन आईपीएस के पद के लिए हो गया। उनका सपना एक हद तक पूरा हो चुका था, लेकिन उनका लक्ष्य इससे भी बड़ा था।

### नौकरी के साथ फिर दी परीक्षा

आईपीएस अधिकारी बनने के बाद भी कार्तिक का सपना आईएएस बनना था। उन्होंने नौकरी के साथ-साथ फिर से यूपीएससी परीक्षा दी। इस बार उन्होंने ऑल इंडिया ८४ वीं रैंक हासिल की। हालांकि, किसी कारण से उनका चयन आईएएस के लिए नहीं हो पाया। इसके बावजूद उन्होंने हार नहीं मानी।

### तीसरी बार में बनी बात, हासिल की ८ वीं रैंक

कार्तिक ने एक बार फिर पूरी तैयारी के साथ परीक्षा दी। साल २०२० में वह तीसरी बार परीक्षा में शामिल हुए और इस बार ऑल इंडिया 8वीं रैंक हासिल की। इस शानदार प्रदर्शन के साथ वह आखिरकार आईएएस अधिकारी बन गए।

### मेहनत और धैर्य की मिसाल

कार्तिक जिवानी की कहानी यह बताती है कि अगर इरादे मजबूत हों और मेहनत सच्ची हो, तो कोई भी लक्ष्य हासिल किया जा सकता है। लगातार तीन बार यूपीएससी परीक्षा पास करना आसान नहीं है, लेकिन उन्होंने अपने फोकस और समर्पण से यह कर दिखाया। उनकी सफलता आज लाखों युवाओं के लिए प्रेरणा बन चुकी है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे




# घृष्णेश्वर दर्शन : ज्याच्या चरणी लीन झाल्याशिवाय १२ ज्योतिर्लिंगांची यात्रा मानली जाते अपूर्ण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्यांच्या दर्शनाशिवाय ही ज्योतिर्लिंग यात्रा अपूर्ण राहते आणि दर्शनमात्रे या सर्व यात्रेचे फळ ज्यांच्या दर्शनाने मिळते, असे भगवान घृष्णेश्वर श्रीक्षेत्र वेरूळ येथे निवास करतात. एल नावाच्या राजाची नगरी म्हणून व एलगंगा नावाच्या नदीकाठी वसलेले पुरातन नगर आज वेरूळ नावाने प्रसिद्ध आहे. पुराणकथा, स्थानिक विविध पोथी, लोककथा, महानुभाव साहित्य यातून वेरुळच्या विविध कथा आख्यायिका समोर येतात. महाशिवरात्रीच्या पावन पर्वाच्या निमित्ताने घृष्णेश्वर भगवान यांची कथा व महती जाणून घेऊया.

### वेरूळ लेण्यांच्या पायथ्याशी मंदिर

घृष्णेश्वर मंदिर हे एक प्राचीन शंकराचे मंदिर असून ते १२ ज्योतिर्लिंगापैकी एक म्हणून प्रसिद्ध आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यापासून सुमारे २६ किलोमीटर अंतरावर आणि वेरूळ लेण्यांच्या पायथ्याशी हे मंदिर आहे. संभाजीनगर मार्गे जाताना रस्त्यावर दौलताबाद देवगिरी किल्ला व श्री भद्रा मारुती दर्शन घडते. छत्रपती



संभाजीनगरवरून दर तासाला महानगरपालिकेच्या शहरबस उपलब्ध असतात.

### श्री आद्य शंकराचार्यांच्या श्लोकात 'घुश्नेशंच शिवालये' असा उल्लेख

वेरूळ महात्म्य अर्थात ब्रम्हसरोवर नामक ग्रंथात विविध युगात असलेल्या वेरुळच्या पुरातन नामांविषयी उल्लेख आहे. कृतयुगात शिवालय, त्रेतायुगात शिवस्थान, द्वापारयुगात एलापूर आणि कलियुगात नागस्थान अशी नावे असल्याचे समजते. नागस्थान म्हणजे वारूळ व वारूळ या शब्दाचा अपभ्रंश वेरूळ असा झाला असावा, असे अभ्यासक मानतात. श्री आद्य शंकराचार्यांच्या श्लोकात 'घुश्नेशंच शिवालये' असा उल्लेख येतो. वेरूळ येथे असलेल्या ३४ लेण्या त्यात राष्ट्रकुट राजांच्या लेखात असलेला एलापूर नामक उल्लेख हा वेरूळचाच आहे, असे भांडारकर यांनी सिद्ध केले आहे. महानुभाव पंथाचे श्री चक्रधर स्वामी यांच्या वास्तव्याने वेरूळ भूमी पवित्र झाली आहे. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे आजोबा श्री मालोजीराजे भोसले यांचे पाटीलकीचे व वास्तव्याचे स्थान वेरूळ राहिलेले आहे.

### पूर्वाभिमुख शिवपिंड

मंदिराचे बांधकाम १५ व्या शतकात मालोजीराजे भोसले यांनी केल्याचे पुरावे आहेत त्यासंबंधीचा शिलालेख आजही मंदिराच्या भिंतीवर आहे. यानंतर अहिल्याबाई होळकर यांनी मंदिराचे भव्य काम १७ व्या शतकात केले जे आज आपल्यासमोर आहे. मंदिर लाल अग्निज खडकात असून मंदिराचा अर्धा वरील भाग हा चुना व तत्सम पदार्थ वापरून उभारला आहे. आतील खांबांवर सुंदर नक्षीकाम असून गर्भगृहाच्या द्वारशाखेवरील रुद्राक्षाची माला खरी वाटावी इतकी सुंदर आहे. मंदिरात गणपती, अंबिका यांच्या मूर्ती आहेत. भव्य मंदिरातील शिवपिंड ही पूर्वाभिमुख आहे आणि जुने मुख्यद्वार दक्षिणाभिमुख आहे. महाशिवरात्र उत्सव, श्रावण सोमवार व विविध मुहूर्तावर घुष्णेश्वराची अलंकार पूजा बांधली जाते. पहाटे ५ दुपारी १२ व सायंकाळी ७ वाजता आरती पारंपरिक वाद्यांसह केली जाते. अधिक मासात ७०० ब्राह्मणांच्या सहाय्याने अतिरुद पूजा ५ दिवस अखंड चालते. वर्षभर मंदिरात गर्दी असते. सुनियोजित रांगांमुळे दर्शन सुलभ होते.

### शिवालय तीर्थ प्रसिद्ध कुंड

मंदिरापासून साधारण ५०० मीटर अंतरावर वेरूळ येथे शिवालय तीर्थ या नावाने प्रसिद्ध कुंड आहे. हे तीर्थकुंड एक एकर परिसरात असून चारही बाजूने आत जाण्यासाठी प्रवेशद्वार आहेत. या कुंडाला एकूण ५६ दगडी पायऱ्या आहेत. या शिवालय कुंडात महादेवाची आठ मंदिरे आहेत. ही मंदिरे भारतातील अष्टतीर्थांची प्रतिकात्मक बांधकामे आहेत, असे सांगितले जाते. यात उत्तरेस काशी, ईशान्येस गया तीर्थ, पूर्वेस गंगा तीर्थ, आग्नेयेला विरज तीर्थ, दक्षिणेस विशाल नैऋत्येस नाशिक तीर्थ इत्यादी आहेत. महिन्यातील प्रत्येक सोमवारी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग वेरूळ येथे राज्यासह परप्रांतातून दर्शनासाठी हजारो भाविक येतात असतात.

## दिवसातून एकदा खालील मंत्रांचा जप करावा

"ॐ त्र्यंबकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात्"
हा महामृत्युंजय मंत्र आहे.
हा मंत्र त्रिनेत्राला पूजण्यासाठी आहे. या मंत्राचा अर्थ असा आहे, की "आम्ही त्रिनेत्राला पूजतो आहोत, जो सुगंधित आहेत, आमचे पोषण करतात".

**महामृत्युंजय मंत्राचे फायदे**

- अनेक दोष दूर होतात.
- अपघाती घटना आणि अकाल मृत्यू टाळता येतो.
- आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते.

**महामृत्युंजय मंत्राचा जप कसा करावा?**


ॐ हौं जूं सः ॐ भूर्भुवः स्वः
ॐ त्र्यंबकं यजामहे सुगन्धिं
पुष्टिवर्धनम् उर्वारुकमिव बन्धनान्
मृत्योर्मुक्षीय मामृतात् ॐ स्वः
भुवः भूः ॐ सः जूं हौं ॐ.
मृत्युंजय महादेव त्राहि मां
शरणागतम् । जन्ममृत्युजरारोगैः
पीडितं कर्मबन्धनैः ॥
नमः शिवाय साम्बाय हरये
परमात्मने । प्रणतक्लेशनाशाय
योगिनां पतये नमः ॥

या मंत्राचा जप कमीत कमी १०८ वेळा किंवा जास्तीत जास्त जेवढा होईल तेवढा जप करावा.

# भगवान शिव यांनी स्वतःच्याच पुत्राला त्रिशूळावर का तोलून धरले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाशिवरात्रीच्या दिवशी आपण भगवान शंकर यांची पूजा करतो. पण शिव यांची 'कृपा' किती विलक्षण आणि प्रसंगी कठोर असू शकते, हे सांगणारी ही कथा खूप कमी लोकांना माहीत आहे. ही कथा आहे अंधकासुराची जो भगवान शिव यांचाच पुत्र होता. पण अज्ञानाच्या अंधारात बुडालेला. ही घटना तेव्हा घडली जेव्हा कैलास पर्वतावर एक विलक्षण लीला झाली. देवी पार्वती यांनी एकदा गमतीने महादेवांचे दोन्ही डोळे आपल्या कोमल हातांनी झाकले. आणि काय आश्चर्य. ज्या क्षणी त्रिनेत्राचे डोळे मिटले, त्या क्षणी संपूर्ण ब्रह्मांडात महाभयंकर अंधार पसरला. सूर्याचे तेज लोप पावले आणि सृष्टी गोठू लागली. त्या अंधारात आणि पार्वती देवींनी झाकलेल्या हातांच्या स्पर्शाने आणि भगवान शिव यांच्या तपःपूत शरीराच्या उष्णतेतून (घर्मातून) एका बालकाचा जन्म झाला (संदर्भ : शिवपुराण, रुद्र संहिता). तो जन्मतःच अंध होता, काळाकुट्ट होता आणि भयानक होता. त्याचे नाव ठेवले गेले अंधक'. हा अंधक म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून आपल्या मनातील 'अविवेक' आणि 'मोह' आहे.



जन्मानंतर या बालकाला असूर राजा हिरण्याक्षाने दत्तक घेतले. अंधक जसजसा मोठा झाला तसतसे त्याने कठोर तप करून ब्रह्मदेवाकडून वरदान मिळविले, की 'माझ्या रक्ताचा थेंब जमिनीवर पडताच त्यातून हजारो नवीन अंधक जन्माला यावेत.' या वरदानाने तो उन्मत्त झाला आणि त्याने तिन्ही लोकांत हाहाकार माजवला. त्याच्या पापाचा घडा तेव्हा भरला, जेव्हा त्याने खुद्द कैलासावर आक्रमण केले. अज्ञानाच्या परमावधीमुळे त्याला हे भानही राहिले नाही, की ज्या देवीला तो जिंकण्यासाठी आला आहे, ती साक्षात त्याची 'माता' आहे. जगदंबेवर टाकलेली ती वक्र दृष्टीच त्याच्या नाशाला कारणीभूत ठरली. शिवाने आपले रौद्र रूप धारण केले आणि दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले. अंधकासुराचे शरीर कपालू लागले, पण तो मरत नव्हता. महादेवाचा त्रिशूळ जेव्हा जेव्हा त्याच्या शरीराचा भेद करायचा, तेव्हा रक्ताचे थेंब जमिनीवर पडायचे आणि त्यातून हजारो राक्षस पुन्हा उभे राहायचे. हे दुष्टचक्र थांबवण्यासाठी महादेवाने योगशक्तीतून 'देवी योगेश्वरी' चे आवाहन केले आणि तिला आदेश दिला की, "याचे रक्त जमिनीला स्पर्श करण्याआधीच तू ते शोषून घे!" देवीने आपली शक्ती वापरली आणि अंधकाचे रक्त जमिनीवर पडणे बंद झाले (संदर्भ : मत्स्य पुराण, अध्याय १७९).

आता खरी वेळ आली होती अंधकाला धडा शिकवण्याची. भगवान शिवाने आपल्या त्रिशुळाने अंधकासुराच्या छातीचा वेध घेतला आणि त्याला चक्क हवेत उचलून धरले! जमिनीपासून वर आणि आकाशाच्या खालीअशा अधांतरी अवस्थेत तो लटकला होता. मृत्यूच्या दारात असताना, जेव्हा शिवाच्या तिसऱ्या डोळ्याची 'ज्वाळा' त्याच्यावर पडली, तेव्हा चमत्कार झाला. त्या उष्णतेने त्याचे शरीर नाही, तर त्याच्या मनातील 'पाप', 'वासना' आणि 'अहंकार' जळून खाक झाले. अनेक युगे तो तसाच त्रिशुळावर लटकत होता. त्या वेदनेने त्याची 'अंध' दृष्टी उघडली. त्याला समजले की, ज्या आदिशक्तीवर मी 'अधिकार' गाजवू पाहत होतो, ती साक्षात माझी 'माता' आहे आणि ज्याच्याशी मी लढत होतो, तोच माझा पिता आणि परमेश्वर आहे. पश्चातापाच्या अग्नीत जळालेल्या अंधकाने तिथेच लटकल्या अवस्थेत शिवाची स्तुती गायला सुरुवात केली. तो म्हणाला, 'हे महादेवा, मला आता जीवन नको, मला फक्त तुमची दृष्टी हवी आहे.'

त्याचे हे परिवर्तन पाहून, 'भोळेनाथ' त्वरित प्रसन्न झाले. त्यांनी त्याला त्रिशूळावरून खाली उतरवून आपल्या 'गण' समुदायात मानाचे स्थान दिले. शिवपुराण आणि वामन पुराणानुसार, त्याला नंदी आणि महाकालाप्रमाणेच 'गणाध्यक्ष' पद मिळाले आणि तो शिवाचा लाडका 'प्रधान गण' बनला, ज्याला 'भृंगीरिटी' (किंवा भृंगीश) या नावाने ओळखले जाते (संदर्भ : शिवपुराण - युद्ध खंड, अध्याय ५९). महाशिवरात्रीचा हा प्रसंग आपल्याला सांगतो की, शिव कधीच कोणाचा द्वेष करत नाहीत.

# पुणतांब्यातील श्री कार्तिकस्वामी मंदिर व शिलालेख

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता तालुक्यात गोदावरी नदीकाठी वसलेले पुणतांबा गाव तेथील गोदावरी नदीला असलेला घाट व त्यावरील मध्ययुगीन मंदिरांमुळे चांगलाच प्रसिद्ध आहे. शनी महात्म्यात वर्णन केलेले तांब लिंदनापूर व पुण्यस्तंभ ही दोन गावे एकत्र येऊन त्याचे पुणतांबा नगर झाल्याचे मानले जाते. पूर्वी ही दोन्ही गावे गोदावरी नदीच्या दोन्ही काठांवर वसली होती. पण पुरामुळे ही दोन्ही गावे उद्ध्वस्त झाल्याने त्याचे एक गाव बनल्याची कथा स्थानिकात प्रचलित आहे. गावाची एकूण प्रमाणबद्ध रचना पाहता ते खरे असल्याचे जाणवते. प्राचीन काळापासूनच हे गाव भरभराटीस आल्याने समृद्ध असे हे गाव नगरकोटाच्या आत असणे साहजिकच आहे. शिर्डीपासून पुणतांबा अंतर फक्त १५ किलोमीटर आहे.

भगवान शिवशंकर यांच्याकडून वरदान मिळवून त्रैलोक्याला सळो की पळो करून सोडणाऱ्या त्रिपुरासुराचा वध कार्तिक महिन्यातील पौर्णिमेस झाला. भगवान शंकर यांनी त्रिपुरासुराचा वध करून त्रैलोक्याला त्याच्या जाचातून मुक्त केले. त्यामुळे तेथे मोठा विजयोत्सव साजरा करण्यात आला. भगवान शिवशंकर यांच्या विजयाची स्मृती म्हणून त्रिपुरारी पौर्णिमा साजरी केली जाऊ लागली. त्याच दिवशी कार्तिकेयांचा जन्म झाला. म्हणून कार्तिकेयांचीही पूजा केली जाऊ लागली. पुणतांबे गावी पुरातनकालीन कार्तिकेय मंदिर आहे. त्या मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेस कृत्तिका महोत्सव साजरा केला जातो. मंदिरासमोर त्रिपूर पेटवून प्रवाहीत केले जातात. कार्तिकी (त्रिपुरारी) पौर्णिमेला मंदिरात जप-तप साधना केल्यास साधकाला फलप्राप्ती होते. त्या दिवशी मध्यरात्री नदीचे पाणी दुधासारखे पांढरे स्वच्छ होते व कार्तिकेय स्वामी त्यावेळी नदीत स्नानासाठी येतात, अशी आख्यायिका आहे. मंदिरात स्त्रियांना प्रवेश नाही. मात्र त्रिपुरारी पौर्णिमा व कृतिका नक्षत्रांवर महिलांना मंदिरात प्रवेश मिळतो व कार्तिकेय स्वामींचे दर्शन घेता येते. कार्तिकस्वामींना नारळ, मोरपीस, रुद्राक्ष, सोने, पिवळे जानवे, तीळ, मूग वाहून प्रसन्न केले जाते. कृत्तिका नक्षत्रावर मंदिरात होणाऱ्या कृत्तिका महोत्सवास लाखो भाविक कार्तिकस्वामींच्या दर्शनाचा लाभ घेतात.

### श्री कार्तिकस्वामी मंदिर शिलालेख

उपलब्धी व स्थळ : हा शिलालेख अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता तालुक्यातील पुणतांबा गावातील गोदावरी नदीकिनारी त्र्यंबकेश्वर महादेव मंदिराशेजारी असलेल्या कार्तिकस्वामी मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराच्या गणेश पट्टीखाली कोरलेला आहे. शिलालेखाच्या शिळेची लांबी २.५ फूट बाय १.५ फूट रुंदी अशी असून त्यावर कोरलेल्या अक्षरांची उंची ३ सें. मी. आहे. सदर शिलालेख कोरीव स्वरूपाचा असून १० ओळींचा देवनागरी लिपीतील मराठी संस्कृत मिश्रभाषेत असून शिलालेख सुस्थितीत आहे. या शिलालेखावर वातावरणाचा कोणताही परिणाम झाला नसून लेखातील सर्व अक्षरे पूर्णपणे ठळकपणे दिसत असून अक्षरांचा खोदीवपणा कायम आहे. लेखावर रंगरंगोटी केल्यामुळे शेवटची ओळ खराब होत चालली आहे. लेखाच्या सुरूवातीला शेवटी दोन उभे दंड दिले आहेत. थोड्या प्रयत्नाने शिलालेख अगदी सहजपणे वाचता येतो.



**शिलालेखाचे वाचन**

१) श्रीगणेशायनमः शके १६९४ नंदननाम सवत्सरे वैशाख शुद्ध २ सोमवार
२) रोहिणी नक्षत्र तद्दिवसि इदं अमृतेश्वर स्थापन श्रीअमृतेश्वरादार
३) ब्रह्मेश्वरपर्यंत घटि सहितं श्रीगणपतिसहितं तथा श्रीसोमेश्वर
४) रसहितं श्रीगंगायां रामेश्वर स्थापन हनमत्सहितं तथा श्रीका
५) सी विश्वेश्वरं स्थापनं श्रीलक्ष्मीनारायणसहितं तथा गरुडस
६) हितं तथा श्रीवृंदावन पंचायतन सहित तथा श्री वृक्षा रोपणइ
७) दं संवैं पुण्यस्तंभवासिपंतीत्कप नामक गोपालपंतस्य प्रपौ
८) त्रेण नरहरिपंतस्य पौत्रेण हरिपंतस्य पुत्रेण लक्ष्मवात्मजेन आं
९) बादासपंत तदिहितेनकृंत श्रीरस्तु मात्रक त्यापरामस्का ॥ १॥
१०) है देवालय के सीत्पलास्का कंनयायद तथा सवास...

अर्थ : शालिवाहन शके १६९४ नंदन संवत्सरात वैशाख शुद्ध द्वितीयेला सोमवारी रोहिणी नक्षत्रात पुणतांब्यातील गोपाळपंतांचे पणतू नरहरिपंतांचे नातू हरिपंतांचे पुत्र आणि लक्ष्मीचे पुत्र अंबादास यांनी या अमृतेश्वर मंदिराची स्थापना केली. अमृतेश्वर मंदिराच्या आकर्षणांत ब्रह्मेश्वर येथील घाट, श्रीगणपती, श्रीसोमेश्वर, रामेश्वर येथील हनुमान, काशी विश्वेश्वर येथे स्थापलेला लक्ष्मीनारायण, गरुड श्रीवृंदावन येथील पंचायतन यांच्या मूर्ती आणि श्रीवृक्ष इत्यादी आहेत.
(शिलालेख वाचक- अनिल दुधाणे, अथर्व पिंगळे)

कार्तिक स्वामी मंदिराचा जीर्णोद्धार अहिल्यादेवी होळकर यांनी केला. तसेच गर्भगृहाच्या भिंतीवर शिलालेखही कोरलेला आहे. घडीव व कोरीव दगडाचे काम असलेल्या त्या मंदिराचा कळस पन्नास फूट उंचीचा आहे. मंदिरासमोर सभामंडप आहे. मंदिरात मध्यभागी शंकराची पिंड आहे. मंदिरामध्ये दक्षिणमुखी कार्तिकस्वामींची मूर्ती, उत्तरेस गणपती तर पश्चिमेस पार्वती व गंगामातेची मूर्ती आहे. मंदिराबाहेर रावणाची मूर्ती आहे तर मंदिराच्या चारही बाजूंना भगवान शंकर यांचे गण व मंदिराच्या उजव्या बाजूला नवग्रहांचे मंदिर आहे. हे मंदिर गोदावरी नदीकिनारी आहे. या गोदावरी तटावर अनेक प्राचीन मंदिरे आहेत. त्यामध्ये प्राचीन त्र्यंबकेश्वर मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, मामा-भाचे मंदिर, खंडोबा मंदिर, संत चांगदेव महाराज यांचे समाधी मंदिर देखील आहे.

# दक्षिण भारतातील सुरुतुपल्ली पल्लीकोंडेश्वर : जगातील एकमेव मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वावर शिवभक्तांसाठी दक्षिण भारतातील एका अत्यंत दुर्मिळ, रहस्यमयी आणि अद्भुत मंदिराची गाथा जाणून घेणे खरोखरच एक विलक्षण पर्वणी ठरेल. आपण नेहमीच भगवान शिवाला ध्यानस्थ बसलेल्या किंवा शिवलिंगाच्या रूपात पाहतो, परंतु संपूर्ण जगात आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूच्या सीमेवर असलेले 'सुरुतुपल्ली पल्लीकोंडेश्वर मंदिर' हे एकमेव असे स्थान आहे जिथे महादेव चक्क शयन अवस्थेत म्हणजेच निद्रिस्त स्थितीत आहेत. यामागची पौराणिक कथा अत्यंत विलोभनीय असून ती समुद्रमंथनाच्या अद्भुत घटनेशी जोडलेली आहे.

जेव्हा देव आणि दानवांनी अमृत मिळवण्यासाठी मंथन केले, तेव्हा त्यातून सर्वांत आधी हलाहल बाहेर आले आणि संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी महादेवाने कोणताही विचार न करता ते स्वतः ग्रहण केले. याचा प्रभाव इतका तीव्र होता की शिवाला भोवळ येऊ लागली, त्यांचा कंठ निळा पडला आणि त्यांना 'नीलकंठ' हे नाव मिळाले. या कठीण प्रसंगी माता पार्वतीने आपल्या अथांग प्रेमाने आणि सामर्थ्याने शिवाच्या गळ्याला स्पर्श करून तो प्रभाव तिथेच रोखला. त्यानंतर कैलासाकडे परतताना शिवाला जेव्हा अत्यंत थकवा जाणवला, तेव्हा त्यांनी याच सुरुतुपल्ली या ठिकाणी माता पार्वतीच्या म्हणजेच देवी 'सर्वमंगलांबिका' यांच्या मांडीवर डोके ठेवून विश्रांती घेतली.

तमिळ भाषेमध्ये 'सुरुट्टा' म्हणजे भोवळ आणि 'पल्ली' म्हणजे विश्रांती घेणे, यावरूनच या गावाला आणि मंदिराला हे नाव मिळाले आहे. या मंदिराच्या गाभाऱ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे इथे केवळ शिव आणि पार्वतीच नाहीत, तर त्यांच्या आजूबाजूला ब्रह्मा, विष्णू, सूर्य, चंद्र, इंद्र, कुबेर आणि इतर देवगण अत्यंत आदराने उभे राहून महादेवाची

### जेथे भगवान महादेव शयनावस्थेत..!



विश्रांती पूर्ण होण्याची वाट पाहत असल्याचे सुंदर दर्शन घडते. या मंदिराशी जोडलेल्या काही अत्यंत दुर्मिळ स्थानिक परंपरा आणि प्रथा आहेत, ज्या या स्थानाचे महत्त्व अधिक वाढवतात. सहसा कोणत्याही शिवमंदिरात भक्तांना प्रसादाच्या रूपात 'भस्म' (विभूती) दिले जाते, परंतु सुरुतुपल्ली हे एकमेव असे शिवमंदिर आहे जिथे भस्माऐवजी भक्तांना 'तीर्थ' (पवित्र जल) दिले जाते, कारण भगवान शिवावर या ठिकाणी औषधोपचार झाले होते अशी स्थानिक धारणा आहे. तसेच, येथील आणखी एक महत्त्वाची प्रथा म्हणजे, थेट शयन अवस्थेतील शिवाचे दर्शन घेण्यापूर्वी भक्तांना 'श्री वाल्मिकेश्वर स्वामी' या स्वयंभू शिवलिंगाचे प्रथम दर्शन घ्यावे लागते.

महर्षी वाल्मिकींनी रामायण लिहिण्यापूर्वी याच शिवलिंगाची स्थापना करून तपस्या केली होती आणि नंतर लव-कुश यांनीही इथेच शिवाची आराधना केली होती, अशी मान्यता आहे. याशिवाय या मंदिरात भगवान 'दक्षिणामूर्ती' हे त्यांच्या नेहमीच्या वैराग्य रूपात नसून चक्क त्यांच्या पत्नीसोबत म्हणजेच 'तारा देवी' सोबत विराजमान आहेत, जे संपूर्ण भारतात अत्यंत दुर्मिळ मानले जाते. जेव्हा शिव विश्रांती घेऊन जागे झाले, तेव्हा सर्व देवांना तिथे पाहून त्यांना अतिशय आनंद झाला आणि त्यांनी नंदीच्या दोन शिंगांच्या मध्ये उभे राहून आपला प्रसिद्ध 'आनंद तांडव' केला. हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र मानले जाणारे 'प्रदोष व्रत' याच आनंदमयी घटनेपासून सुरू झाले. त्यामुळे महाशिवरात्री आणि शनि प्रदोषाच्या दिवशी या मंदिरात दर्शनासाठी जाणे अत्यंत फलदायी मानले जाते. प्रदोषाच्या वेळी शिवाचा दाह शांत करण्यासाठी इथे गाईच्या दुधाचा अभिषेक करण्याची आणि नंदीला गोड प्रसादाचा नैवेद्य दाखवण्याची विशेष प्रथा आहे. तसेच सुवासिनी महिला आपल्या वैवाहिक जीवनाच्या कल्याणासाठी आणि मांगल्य भाग्यासाठी माता सर्वमंगलांबिकेसमोर तुपाचा दिवा लावून विशेष प्रार्थना करतात. देवी उपासनेचे आणि दक्षिण भारतीय मंदिरांचे गूढ ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या प्रवासात, माता सर्वमंगलांबिकेचे हे वात्सल्य रूप आणि शिव-शक्तीच्या अद्वैताचा हा प्रसंग खऱ्या अर्थाने अभ्यासण्यासारखा आहे. भगवान शिवाचे हे अद्भुत रूप, येथील अनोख्या परंपरा आणि माता पार्वतीचे हे प्रेमळ स्वरूप प्रत्येकाने एकदा तरी अनुभवावे असेच आहे.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**